# जागतिकीकरण आणि नागरीकरण

**डॉ. संजय काळे**
*अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू , महाविद्यालय भोकर जि. नांदेड*

--------------(12)--------------

**प्रस्तावना :-**

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये काही मोठे बदल घडुन आले. १९८५ नंतर वेगाने घडुन आलेल्या या बदलांना जागतिकरकरण असे नाव मिळाल व त्यामुळे बहुतेक सर्व देशाच्या अर्थव्यवस्था प्रभावित झाल्या. सामान्य भाषेत असे म्हणता येईल की, जगातील विविध राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना परस्पर जोडणारी, त्यांच्यामध्ये वस्तू -सेवा, भांडवल, तंत्रज्ञान, श्रम यांचा मुक्त प्रवाह सुरू करण्याची एक रचना म्हणजे जागतिकीकरण.१ **प्रो.जगदीश भगवती** यांच्या मते, "जगातील राष्ट्रीय अर्थव्यवस्थाना एका आंरराष्ट्रीय अर्थरचनेचा अभिन्न भाग बनविण्याचे धोरण म्हणजे जागतिकीकरण होय. व्यापार भांडलव, तंत्रज्ञान आणि श्रम यांचा मुक्त संचार हे त्याचे माध्यम आहे. **प्रो.बोक्रो** यांच्यामते, "भांडवल, वस्तू, तंत्रज्ञान, विचार आणि लोक यांचा मुक्त संचार म्हणजे जागतिकीकरण.''

देशोदेशीच्या भौगोलिक सीमांचा विचार न करता त्यामध्ये आर्थिक व्यवहार मुक्तपणे होणे ही जागतिकीकरणाची मुळ कल्पना आहे. पूर्वीच्या मुक्त व्यापाराची संकल्पना अशीच असलीतरी त्यावेळी विज्ञान व तंत्रज्ञानाची अभूतपूर्व प्रगती झालेली नव्हती. या क्रांतीमुळे सर्व संदर्भ बदलेले असून संपूर्ण जग अतिशय जवळ आले आहे. १९९१ च्या आर्थिक सुधारणांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा सांधा जागतिक अर्थकारणाशी जोडला गेला.

उदारीकरणानंतरच्या टप्प्यात भारताच्या आर्थिक विकासात नगरे आणि शहरी भागांना अनन्य साधारण असे महत्व आले आहे. उदारीकरणामुळे भारतीय बाजारपेठा परकीय उदयोजकांना खुल्या झाल्या. खाजगीकरणामुळे सार्वजनिक उदयोगांच्या

संख्येत घट झाली आणि बाजाराभिमुख उदयोगांची निर्मिती झाली. जागतिकीकरणामुळे सर्व जग भारताच्या जवळ आले. औद्योगिक क्षेत्राची भरभराट झाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमधील भारताच्या वाढत्या सहभागाबरोबरच भारतामधील शहरीकरणही वेगाने वाढत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणामुळे झालेले भारतातील नागरीकरण या विषयावर अध्ययन केलेले आहे.

*** नागरीकरण :-**

नागरीकरणाविषयी अभ्यास करतांना असे दिसून येते की, प्राचीन कालखंडात भारतात सुमारे ५५०० वर्षापूर्वी सिंधुसंस्कृतीच्या कालखंडात नगरे अस्तित्वात होती. परंतु नागरीकरणाची प्रक्रिया अस्तित्वात नव्हती. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नगराची रचना कशी असावी यासंबंधी चर्चा झालेली दिसून येते. २प्राचीन काळात अनेक राजे महाराजांनी आयोध्या, काशी,वैशाली उज्जैन या सारख्या शहरांची निर्मिती केली होती. मुघलांच्या काळात दिल्ली, आग्रा, लखनौ, सुरत, अहमदाबाद येथे शहरीकरण असल्याचे अवशेष सापडतात. ब्रिटीश काळात सुधा भारतात अनेक शहरे उदयास आले. मुंबई, मद्रास, कलकत्ता या शहरांची निर्मिती बंदरामुळे करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषेवर आधारित प्रांतरचना करण्यात आली. राज्याची व केंद्रशासित प्रदेशाची निर्मिती करण्यात आली. प्रत्येक राज्यामधील राजधानी, जिल्हे, तालुके यांची निर्मिती करण्यात आली. त्या प्रत्येकाच्या निर्मितीचे मापदंड ठविण्यात आले. त्यांना नियंत्रित करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेची निर्मिती करण्यात आली.२ आधुनिक काळात नागरीकरण ही अपरिहार्य प्रक्रिया झालेली आहे. औद्योगिकरण व नागरीकरण यांचा परस्पर संबंध असून औद्योगिकरणाच्या समवेत नागरीकरण होताना दिसून येते.

**नागरिकरणाचा अर्थ / व्याख्या :-**

१) **मार्विन ओल्सन यांच्यामते,** "खेडयातील लोक नगराकडे जाणे म्हणजे नागरीकरण होय.''

२) **जे.सी. ग्रॅन्ड बोस** यांच्या मते, नागरीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामुळे शेती क्षेत्राकडून बिगरशेती क्षेत्राकडे कामगारांना आकर्षित केले जाते, नवीन व्यवसाय चालू करून आर्थिक व सामाजिक रचना बदलली जाते, त्यालानागरीकरण असे म्हणतात.''

३) **युनायटेड नेशन्सच्या** मते (१९५७), "शहरीकरण ही अशी प्रक्रिश आहे की, ज्यामुळे शहरी भागातील लोकसंख्येचे प्रभाण वाढते. त्यामुळे सांस्कृतिक व सामाजिक बदल होऊन जीवन जगण्यात आधुनिकता येते व शहराच्या सीमा विस्तारीत होऊन खेडयांची संख्या कमी होते. त्यालाच नागरीकरण असे म्हणतात." १९९१ [३]च्या जनगणनेनुसार नगर / शहर निश्चित करतांना खालील निकष मान्य केले आहेत.

अ) ज्या वस्तीमध्ये महानगरपालिका, नगरपरिषद, कॅन्टोनमेंट बोर्ड स्थापन झाले आहेत अशा वस्त्या की, ज्या शासनाने नगर म्हणुन मान्य केल्या आहेत.

ब) खालील निकष पूर्ण करण्याऱ्या वस्त्यांना नगर (शहर) म्हणून मान्य करावे.

१) ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या
२) दर चौरस कि. मी.ला ४०० पेक्षा अधिक लोकसंख्येची घनता.
३) त्या ठिकाणी पोस्ट ऑफीस, छापखाने, बँका, महानगरपालिका, नगरपरिषद, दळणवळणाची साधने, मनोरंजन केंद्रे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.
४) कृषी व्यवसाय सोडून इतर व्यवसायात ७५ % लोकसंख्या गुंतलेली आहे.

नागरीकरण ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेतूनच अनेक शहरे अस्तित्वात आली काही शहरांचा विकास औद्योगिकरणामुळे तर काही शहारांचा विकास राजकारणामुळे व काही शहरांचा विकास धार्मिक बाबीमुळे झालेला होताना दिसून येते. [३]

[४]नागरीकरण ही संकल्पना संख्यात्मक वाटत असली तरीसुध्दा तिचा पाया गुणात्मक आहे. नागरीकरण म्हणजे केवळ ग्रामीण भागामधून शहरी भागात मोठया प्रमाणात होणारे स्थलांतर नसून किंवा शहरी भागातील पायाभूत सुविधा पुरेशा प्रमाणात प्रविणे, आधारभूत संररचनेत वाढ होणे, शैक्षणिक, आरोग्यविषयक सुविधांची उपलब्धता असणे, शहरी भागातील रोजगारामध्ये वाढ होणे, स्वच्छ वातावरण राखले जाणे इत्यादी व अनेक गोष्टीमधील वाढीचा शहरीकरणामध्ये समावेश होतो. [४]

वरील सर्व व्याख्या व निकषाचा अभ्यास केला असता नागरीकरण ही एक ग्रामीण स्थलांतरणाची प्रक्रिया असल्यचे स्पष्ट होते. नागरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीपेक्षा लोकसंख्येच्या स्थलांतरणाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

**भारतातील नागरीकरणाची प्रवृत्ती**

| वर्ष | एकून लोकसंख्योशी नागरी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|
| १९५१ | १७.३० |
| १९६१ | १७.९७ |
| १९७१ | १९.९१ |
| १९८१ | २३.३३ |
| १९९१ | २५.७१ |
| २००१ | २७.८० |
| २०११ | ३१.८० |

१९८५ नंतर देशात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. राजीव गांधीच्या काळातच उदारीकरणाचा चंचू प्रवेश झालेला होता. १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारने नवीन आर्थिक सुधारणांना सुरूवात केले. डॉ. मनमोहनसिंग हे त्यावेळेचे अर्थमंत्री होते. त्यांनी उदारीकरण, खालगीकरण आणि जागतिकीकरणाचा जोरदार पुरस्कार केला. ज्यामुळे विदेशी गुंतवणूक व खाजगी गुंतवणूक देशात वाढली आंतरराष्ट्रीय वित्त संस्थाकडूनही मोठी मदत मिळाली. ज्यामुळे औद्योगिकरण व कृषी सुधारणा घडून येण्यास सुरूवात झाली तसेच रोजगारातवाढ घडून येवून आर्थिक विकासाचा वृध्दीदर वाढीस लागला. या नवीन आर्थिक सुधारणाचा एकंदरीत परिणाम देशात

नागरीकरण मोठया प्रमाणात घडून येण्यास सुरूवात झाली. १९८१ मध्ये एकुण लोकसंख्येत नागरी लोकसंख्येचे प्रमाण २३.३३ टक्के होते, त्यामध्ये वाढ होवून हे प्रमाण सन २०११ मध्ये ३१.८० टक्के झाले. म्हणजेच, जागतिकीकरणानंतर जेव्हा नविन आर्थिक सुधारणांना सुरूवात झाली तेव्हा नागरीकरणाचे प्रमाण देखील वाढल्याचे दिसून येते

*** नागरीकरणाची कारणे :-**

१) **औद्योगिकरण :-** [५] वाढत्या उदयोगधंदयामुळे शहरातील दळववळण रस्ते, बाजारापेठा, शेक्षणिक सुविधांचा विकासा झाला. रोजगारीच्या संधी शहरामध्ये मोठयाप्रमाणात निर्माण झाल्यामुळे लहान - लहान खेडयातून, ग्रामीण भागातून लोक मोठया प्रमाणात रोजगारासाठी व्यवसायासाठी शहराकडे स्थलांतरीत होताना दिसतात.

२) **स्थलांतरण :-** ग्रामीण लोकसंख्या नोकरी व व्यवसाय या कारणामुळे शहराकडे स्थलांतरीत झाली. नैर्सगिक लोकसंख्योच्या वाढीच्या दरापेक्षा स्थलांतरीत लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असल्यामुळे नागरीकरण अधिक वेगाने घडून येत आहे.

३) **प्रशासकीय कार्यालये :-** ज्या शहरामध्ये प्रादेशिक कार्यालये व जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण, मिलिटरी कॅम्प स्थापन झालेले आहेत अशा शहारामध्ये नोकऱ्यासाठी अनेक लोक बाहेर गावाहुन येऊन स्थायिक झालेले दिसून येतात. त्यामुळे प्रत्येक शहरांची नागरीकरणाची प्रवृत्ती वाढत आहे.

४) **शहरी जीवनाचे आकर्षण :-** मोठया शहरामध्ये नागरी सुविधा ग्रामीण भागापेक्षा व लहान शहरापेक्षा चांगल्या दर्जाच्या उपलब्ध असतात, म्हणून ग्रामीण भागातील व लहान शहरामधील व्यक्तीना शहरी जीवनाचे आकर्षण वाटते. उंच इमारती, मुक्त वातावरण, मुलभुत सुविधांची उपलब्धता, शैक्षणिक सुविधा, रोजगार सहज उपलब्ध असण्याची सोय इत्यादी बाबीमुळेशहरी भागाबद्दल आकर्षण वाटते. त्यामुळे शहरीकरण प्रवृत्तीत वाढ होत आहे. .

५) **सामाजिक वातावरण :-** ग्रामीणभागामध्ये व लहान नगरामध्ये आजही जातीयवाद व अस्पृश्यता पाळली जाते. अनेकवेळा बहिष्कार टाकले जाते. या बाबीना शहरामध्ये कोणत्याही प्रकारचे स्थान नसल्यामुळे शहरात अनेक जाती धर्माचे लोक एकत्र सुखासमाधानाने राहुन कामे करतात.

६) **वाहतुक व दळणवळणाच्या सोयीत वाढ :-** नविन रेल्वेमार्ग, रस्तेमार्ग, हवाईवाहतुक यामध्ये वाढ होत गेल्यामुळे अनेक गावाचा संपर्क त्वरित साधने शक्य झाले. परिणामतः अशा गावाचे नागरीकरण वाढतांना दिसून येते.

७) **शैक्षणिक सुविधा :-** मोठया शहरामध्ये विद्यापीठ अभियांत्रिकी कॉलेज, मेडीकल कॉलेज, इतर व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम, कृषी महाविद्यालये केंद्रीत झाली असुन या ठिकाणी शैक्षणिक सुविधा मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील युवक व युवती स्थलांतरीत होत आहे.

८) **व्यक्तीमत्व विकाससास योग्य वातावरण :-** प्रत्येक व्यक्तीला इच्छेनुसार व्यवसायाची व नोकरीची संधी उपलब्ध असते. कला गुणांच्या विकासास योग्य वातावरण, मनोरंजनाची साधने, सामाजिक सुरक्षितता अशा सुविधा उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण लोक शहराकडे येत आहेत.[५] वरील व इतर कारणामुळे भारतातील नागरीकरणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणानंतर भारतातील शहरांच्या संख्येत वाढ झाली. १९८१ [६]मध्ये शहरांची संख्या ३३७८ होती सन १९९१ मध्ये ३७६८ झाली, आणि २००१ मध्ये ५१६१ झाली.[६] [७]उदारीकरणानंतर देशांतर्गत सथूल उत्पादनात शहरी भागाचा वाटा वाढला. १९८०-८१ मध्ये हा वाटा ४७ टक्के होता, सन २००७ पर्यंत हा वाटा ६२ ते ६३ टक्के एवढा झाला. सन २०१२ पर्यंत हा वाटा ७५ टक्के पर्यंत पोहचला.[७] उदरीकरणामुळे भारतीय बाजारपेठा परकीय उदयोजकांना खुल्या झाल्या. खाजगी करणामुळे सार्वजनिक उदयोगांची संख्येत घट झाली आणि बाजाभिमुख खाजगी उदयोगांची निर्मिती झाली. जागतिकीकरणामुळे सर्व जग भारतच्या जवळ आले. परकीय उदयोगा बरोबर झालेल्या एकत्रीकरणामुळे औद्योगिक क्षेत्राची भरभराट झाली. ज्यामुळे शहरीकरण वाढण्यास मदत झाली. उदयोगधंदे व कारखानदारीमुळे आजुबाजूच्या वसाहतीमधून स्थलांतरीत झालेल्या लोकामुळे या गावची नगरे / शहरे झाली. [८]जागतिकीकरणाच्या काळात शहरातील घरबांधणी, वाहतुक, व्यापारी व माहीती तंत्रज्ञानावर आधारीतसेवा या महत्वाच्या क्षेत्रात बदल झाले. वास्तव

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

मालमत्तेत थेट १००% विदेशी गुंतवणुकीस मुभा आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय खाजगी उदयोगांना शहरीमध्ये स्थानिक भागीदाराबरोबर गुंतवणुक करण्यास प्रेरणा मिळाली. शहरातील सेवा क्षेत्रात खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे शहरी विकासाला चालना मिळाली.[८]

**समारोप :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमधील भारताच्या वाढत्या सहभागाबरोबरच भारतमधील शहरीकरणही वेगाने वाढत आहे. भारतातील नागरीकरण घडून येण्यास प्रमुख कारण रोजगार / व्यवसायाची संधी हे राहीले आहे. उदारीकरणामुळे गुंतवणुकीत वाढ होवून औद्योगिकरण वाढले ज्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. रोजगारासाठी ग्रामीण भागातील लोकांचे मोठयाप्रमाणात स्थलांतर होण्यास सुरूवात झाले. प्रशासकीय कार्यालये व उदयोगधंदयामुळे शहरांच्या संस्खेत वाढ घडून आली. मुंबई अहमदनगर, चेन्नई बंगळूरू आणि हैद्राबाद या महानगराच्या भागात शहरी पट्टा निर्माण झाल्यामुळे अनेक प्रमुख शहरे जोडली गेली. १९८१ मध्ये दर चौ. कि. मी. शहरी लोकसंख्येची घनता २३० होती. जागतिकीकरणानंतर २०११ ला ३८२ झाली. १९८१ मध्ये शहरी लोकसंख्येचे प्रमाण २३३ टक्के होत यामध्ये वाढ होवून २०११ मध्ये ३१.८ टक्के झाले. शहराची संख्यादेखील मोठयाप्रमाणात वाढली एकंदरीत, जागतिकीकरणाच्या धोरणामुळे खाजगी व विदेशी गुंतवणूकीस प्रेरणा मिळाली. ज्यामुळे औद्योगिकरण घडून येवून रोजगार वाढण्यास मदत झाली. रोजगार व व्यवसायाच्या संधी शहरीभागात वाढल्यामुळे नागरीकरणात वाढ घडून आल्याचे दिसून येते.

**संदर्भ सुची -**

१) वसुधा पुरोहित (२०१६), 'कृषी अर्थशास्त्र विद्या' बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद पृ - ५६४
२) सुकाळे / कोंडेकर (जुलै- सप्टे. २०१३), 'अर्थसंवाद' पृ - १९७
३) जे. व्ही. गायकवाड (२०१२), अमरावती जिल्हयातील नागरीकरणाचे स्वरूप व समस्यांचे विश्लेषण पृ - २
४) सुकाळे / कोंडेकर - कित्ता
५) जे.व्ही. गायकवाड (२०१२) - कित्ता पृ - ६,७,८
६) कित्ता
७) आर. बी. भगत (२०१४) योजना पृ - ५
८) जोशी / महाजन (जुलै - सप्टे २०१३) अर्थसंवाद पृ ११२